CNRNOMHSN090009742015

**नि.दि.मु.क्र.२२२/२०१५ मधील नि.क्र.३५, ३७ व ३९ खालील संयुक्त आदेश**
**(आदेश पारीत दिनांक ०३/०५/२०२३ रोजी)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.०२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेसाठी व अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०२ कल्लाप्पा शेकू चव्हाण हे दि.०१.१२.२०१९ रोजी मयत झाले असुन त्यांचे निशाणी क्र.३७ चे अर्जातील नमुद २/अ व २/ब हे कायदेशिर वारस आहेत. तसेच, त्या वारसांना याकामी सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ०२ हे मयत झालेनंतर त्याचे वारस दावेकामी ९० दिवसांत रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु, कोरोना महामारीमुळे त्यांचा वारसांची माहिती घेवुन यांचे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल करता आले नाहीत. त्यामुळे दावा प्रतिवादी क्र. ०२ यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. वादीने जाणुनबुजून प्रतिवादी क्र.०२ चे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब केलेला नाही. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून नि.क्र. १ मध्ये प्रतिवादी क्र.०२ यांचे नावापूढे मयत असे नमुद करुन त्यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १,३,४ व ५ अ ते ५ क यांनी सदर अर्जावरील एकत्रीत म्हणणे नि.क्र. ३७ वर दाखल करुन वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द तुर्तातूर्त व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी नं.०२ कल्लाप्पा शेकू चव्हाण हे दिनांक ०१/१२/२०१९ रोजी मयत झालेबाबत नि.३४/१ कडे मृत्यूचा

दाखला हजर केला आहे. सदर मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.०२ हे दिनांक ०१.१२.२०१९ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. याकामी वादीतर्फे वकीलांनी दिनांक १९.०१.२०२२ रोजी नि. क्र. ३५ अन्वये मयत प्रतिवादी नं.०२ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणेकरिता अर्ज दिला होता. वादींनी प्रतिवादी क्र. ०२ चे वारस अभिलेखावर घेणेस जवळपास तीन वर्षाचा विलंब केला आहे हे स्पष्ट होते. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता व दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेकरिता प्रतिवादी नं. ०२ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. म्हणून वादी यांचा नि.३५ कडील अर्ज विलंब माफीचा अर्ज मंजूर करुन नि.३९ कडील अर्जाप्रमाणे प्रतिवादी नं. ०२ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड करुन नि.३७ प्रमाणे प्रतिवादी क्र. ०२ चे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.३५, ३७ आणि ३९ कडील अर्ज दंड रक्कम रु. ५००/- (रक्कम रुपये पाचशे) प्रतिवादींना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. दंड रक्कम प्रतिवादी यांना दिलेनंतर वादी यांनी प्रतिवादी नं.०२ यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत १४ दिवसाच्या आत दाखल करावी.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2023.05.03 17:05:41 +0530

**तासगांव.** **(डॉ.आर.एस.कुळकर्णी)**

**दि.०३.०५.२०२३** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | **०३.०५.२०२३** |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | **०३.०५.२०२३** |
| आदेश अपलोड दिनांक | – | **०३.०५.२०२३** |